शैक्षणिक वर्ष २०१२–१३ करिता नवीन महाविद्यालये /संलग्नित महाविद्यालयांसाठी अभ्यासक्रम/ विषय/ विद्याशाखा/ तुकडी/नैसर्गिक वाढ/ संलग्निकरणाचे नूतनीकरण /कायम संलग्निकरण इत्यादीसाठी प्रस्ताव/आवेदनपत्र सादर करणेबाबत.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## परिपत्रक

जावक क्र. शैक्षणिक/सलग्न/०३/२०११–१२/११७९, दि. २७/०९/२०११

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या कार्यक्षेत्रात शैक्षणिक वर्ष २०१२–१३ करिता नवीन महाविद्यालये व संलग्नित महाविद्यालयांसाठी अभ्यासक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडी /नैसर्गिक वाढ/ संलग्निकरणाचे नूतनीकरण/ कायम संलग्निकरण इत्यादीसाठी सादर करावयाचे विहीत नमुन्यातील आवेदनपत्र / प्रस्ताव, व विद्यापीठाचा बृहत आराखडा ( Prespective Plan 2012-13 ) व महाराष्ट्र शासनाच्या दि. ३०/१०/२०१० चा निर्णय सर्व परिशिष्टांसह विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात दि. ०१ ऑक्टोबर २०११ पासून विक्रीस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. संबंधीत आवेदनपत्र / प्रस्ताव, शासन निर्णयासोबतचे परिशिष्ट 'अ' अर्ज पूर्णपणे भरून विहीत शुल्कासह व परिशिष्ट 'ब' नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे प्रत्येक प्रस्तावास क्रमाने लावून विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ८२ (३) अन्वये ३१ ऑक्टोबर २०११ अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

आवेदनपत्र / प्रस्ताव सादर करण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या दि. ३०/१०/२०१० च्या निर्णयानुसार व विद्यापीठ अनुदान आयोग ( विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदीनुसार व बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संलग्निकरणाची मागणी करण्यापूर्वी आवश्यक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि इतर इमारती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांची उपलब्धता, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यादींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था इत्यादी सर्व बाबींची उपलब्धता असणे आवश्यक आहे.

उपरोक्त आवेदनपत्र/प्रस्ताव सादर करतेवेळी खालील बाबींची विशेष काळजी घ्यावी.

- पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र आवेदन पत्र /प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.
- प्रस्ताव/आवेदन पत्रामधील सर्व रकाने पूर्णपणे भरावेत. अर्धवट भरलेले प्रस्ताव/आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत. नजरचूकीने स्वीकारलेल्या अर्धवट आवेदनपत्रावर / प्रस्तावावर संलग्निकरणाबाबतची पुढील कार्यवाही केली जाणार नाही.
- प्रस्ताव/आवेदनपत्र सादर करीत असतांना त्यात बृहत आराखडयातील कोणत्या पानावर दर्शविलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव दाखल करण्यात येत आहे, याचा स्पष्ट उल्लेख करावा.
- प्रस्ताव/आवेदन पत्रासोबत विहीत शुल्काचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. कमी शुल्क भरलेल्या महाविद्यालयाच्या प्रस्तावावर पुढील कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. आवेदनपत्र/प्रस्ताव अर्धवट असल्यामुळे किंवा चुकीच्या रकमेचा धनाकर्ष काढल्यामुळे जर एखाद्या महाविद्यालयाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला गेला नाही, तर त्याची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.
- नवीन अभ्यासक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडी इत्यादीची मागणी करणाऱ्या महाविद्यालयांनी आवेदन पत्रात विहित ठिकाणी त्यांच्याकडे अस्तित्वात असलेल्या विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, वर्गनिहाय तुकडया, विद्यार्थी संख्या इत्यादीचा स्पष्ट उल्लेख करावा.

- पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात मान्यताप्राप्त नियमित प्राचार्य व किमान ७० टक्के शिक्षक नसल्यास अशा महाविद्यालयाच्या सर्व प्रस्तावास शासनाकडे नकारात्मक शिफारस करण्यात येईल. त्यासाठी प्रस्तावसोबत प्राचार्य/शिक्षक मान्यतेच्या प्रती जोडाव्यात.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखेसाठी किमान दोन आणि कला व वाणिज्य विद्याशाखेसाठी किमान एक मान्यता प्राप्त शिक्षक नसल्यास अशा महाविद्यालयाच्या सर्व प्रस्तावास शासनाकडे नकारात्मक शिफारस करण्यात येईल. त्यासाठी प्रस्तावासोबत शिक्षक मान्यतेच्या प्रती जोडाव्यात.
- ज्या महाविद्यालयांनी नॅकची प्रक्रिया सुरू केलेली नाही अशा पदवी /पदव्युत्तर महाविद्यालयाच्या सर्व प्रस्तावास शासनाकडे नकारात्मक शिफारस करण्यात येईल. त्यासाठी प्रस्तावासोबत नॅकची प्रक्रिया सुरू असल्याबाबत व त्याअनुषंगाने नॅक कार्यालयाकडे दाखल केलेल्या पत्र व्यवहाराच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.
- कायम संलग्निकरणासाठी महाविद्यालयास सहा वर्ष पूर्ण होणे आवश्यक असल्याने, संलग्निकरणासाठी प्रस्ताव सादर करतेवेळी त्यासोबत विषय/विद्याशाखांची सहा वर्षांची संपूर्ण माहिती विहीत प्रपत्रात सोबत जोडणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयास कायम संलग्निकरण प्राप्त झाले असल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख करून सोबत मान्यतेच्या प्रती जोडाव्यात.
- संलग्निकरणाच्या नूतनीकरणाच्या प्रस्तावामध्ये, अ/ब/क/ड/ प्रपत्र व शासनाकडे पाठवावयाचे प्रपत्र हे DVB-TTSUREKH या फॉन्ट मध्ये भरून सी.डी. सह दाखल करणे अनिवार्य आहे. सदर प्रपत्र नूतनिकरणाच्या अर्जासोबत प्रस्तावासोबत उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
- ज्या महाविद्यालयांकडे पूर्वीचे संलग्निकरण शुल्क बाकी आहे, त्या महाविद्यालयांनी संलग्निकरण प्रस्ताव सादर करण्यापूर्वी बाकी संलग्निकरण शुल्क दिनांक १५/१०/२०११ पर्यंत जमा करावे, अन्यथा आपलया महाविद्यालयाच्या सदर करणामुळे आवेदनपत्र स्वीकारले न गेल्यास यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
- ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात ( विशेषत: शेवटच्या दोन तीन दिवसात ) नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी होणाऱ्या गर्दीचा विचार करता, संलग्नित महाविद्यालयासाठी संलग्निकरण शुल्क तपासणी कर्यक्रम हा पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) नांदेड जिल्हा | – | दि. १४ ते २० ऑक्टोबर, २०११ |
| ब) लातूर जिल्हा | – | दि. १४ ते २० ऑक्टोबर, २०११ |
| क) परभणी | – | दि. २१ ते २५ ऑक्टोबर, २०११ |
| ड) हिंगोली जिल्हा | – | दि. २१ ते २५ ऑक्टोबर, २०११ |

तरी, सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी वरील कार्यक्रमानुसार, सार्वजनिक सुट्टया वगळून, विद्यापीठ उपस्थित राहून, संलग्निकरण शुल्क/कायम संलग्निकरण शुल्क/ नवीन मागणीसाठी प्रक्रिया शुल्क ई. तपासून आपले प्रस्ताव विहीत तारखेमध्ये किंवा त्यापूर्वी सादर करावेत.

स्वा/–
**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत : माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
२. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
३. सिस्टीम एक्सपर्ट, यु.जी.सी. संगणककक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर बी.सी.यू.डी अंतर्गत प्रसिध्द करावे.